11 MAY 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## अकृषी राज्य विद्यापीठांत अग्रस्थानी; संशोधकांच्या जागतिक क्रमवारीत ९२ जण

# शिवाजी विद्यापीठ 'मटेरियल सायन्स'मध्ये भारी

**विज्ञान तंत्रज्ञान दिन विशेष**

▶ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १० : दैनंदिन जीवनातील समस्या सोडवण्याच्या उद्देशाने संशोधन केल्या जाणाऱ्या मेटेरियल सायन्समध्ये शिवाजी विद्यापीठ राज्यात भारी ठरले आहे. 'करन्ट सायन्स'ने त्यावर शिक्कामोर्तब केले. भौतिकशास्त्र, खगोल, अभियांत्रिकी क्षेत्रातील संशोधनात अकृषी राज्य विद्यापीठांमध्ये अग्रस्थान मिळविले. संशोधकांच्या जागतिक क्रमवारीत विद्यापीठातील प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी, अशा ९२ जणांचा समावेश आहे.

विज्ञान व तंत्रज्ञान दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या संशोधन क्षेत्रातील कामगिरीचा आढावा घेण्यात आला. अमेरिकेच्या आल्पर डॉजर तथा ए. डी. सायंटिफिक इंडेक्सनुसार विश्लेषित वर्ल्ड सायंटिस्ट अँड युनिव्हर्सिटी रँकिंग-२०२३ या नुकत्याच जाहीर झालेल्या क्रमवारीत विद्यापीठातील एकूण ९२ वैज्ञानिक, संशोधकांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे स्टॅनफर्ड विद्यापीठाने विश्लेषित केलेल्या जागतिक स्तरावरील दोन टक्के आघाडीच्या संशोधकांच्या क्रमवारीत दहा संशोधकांना स्थान मिळाले आहे. त्यात विद्यापीठाचे २५ माजी विद्यार्थी आहेत. फेब्रुवारी २०१८ मध्ये 'करन्ट सायन्स'ने सन २०११ ते २०१६ या



कालावधीतील संशोधनावर आधारित जाहीर केलेल्या क्रमवारीत मटेरियल सायन्समध्ये सर्वसाधारण जवाहरलाल नेहरू सेंटर फॉर अ‍ॅडव्हान्स्ड सायंटिफिक रिसर्च बेंगलोर पहिल्या क्रमांकावर, इंडियन असोसिएशन फॉर द कल्टिव्हेशन ऑफ सायन्स कोलकता दुसऱ्या आणि शिवाजी विद्यापीठ तिसऱ्या आणि अकृषी राज्य विद्यापीठांत पहिल्या क्रमांकावर आहे. शिवाजी विद्यापीठाच्या संशोधनाच्या क्षेत्रातील दर्जा व गुणवत्तेवर पुनश्च शिक्कामोर्तब झाले आहे. विद्यापीठातील संशोधकांचे शोधनिबंध जागतिक स्तरावरील संशोधकांकडून अभ्यासले जातात. वेगवेगळ्या शोधनिबंधांमधून त्यांच्या शोधनिबंधांचे साइटेशन्स देण्यात येतात.

> शिवाजी विद्यापीठातील मटेरियल सायन्स अँड टेक्नॉलॉजीमधील शिक्षक, संशोधक विद्यार्थ्यांनी गेल्या तीन दशकामध्ये केलेले जागतिक दर्जाचे संशोधन फार समाधानकारक आहे. त्यातून विद्यार्थ्यांची बौद्धिकता, कार्यकुशलता, गुणवत्ता सुधारली आहे. जागतिक दर्जाच्या प्रयोगशाळाही उभारल्या आहेत. यापुढे अशा संशोधन प्रकल्पांतून निर्माण झालेल्या नवीन संकल्पनेवर आधारित नवउद्योजकता, पेटंट, टेक्नॉलॉजी ट्रान्सफर, स्टार्टअप सुरू होतील, अशी अपेक्षा आहे.
>
> **- डॉ. प्रमोद पाटील**, प्र-कुलगुरू

### विविध विषयांवरील ६३ पेटंट

■ राष्ट्रीय स्तरावरील संशोधनाबाबत देशातील विद्यापीठांचे जे मूल्यांकन झाले, त्यामध्ये शिवाजी विद्यापीठाचा 'एच' इंडेक्स १२५ इतका असून एकूण ७४७४ प्रकाशित शोधनिबंधांना ७७,२४० इतकी सायटेशन्स प्राप्त आहेत. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाचे संशोधकीय मानांकन देशात उंचावले. विविध विषयांतील सुमारे ६३ बौद्धिक संपदा हक्क (पेटंट) विद्यापीठाने प्राप्त केले आहेत. तंत्रज्ञान हस्तांतरण, नवउत्पादन विकास आणि कन्सल्टन्सी या तिन्ही प्रकारे उद्योग-व्यवसाय यांच्या माध्यमातून समाजोपयोगी संशोधन विद्यापीठात होत आहे.

### वर्षभरात मिळाला ८३ लाखांचा निधी

■ विद्यापीठाच्या विकासासाठी, संशोधन कार्यात विविध अधिविभागातील शिक्षक प्रयत्नशील असल्याने संशोधन व विकासासाठी डीएसटी-फिस्ट, डीएसटी-सर्ब, डीएसटी-इन्स्पायर, डीएसटी-स्तुती या वित्तीय शिखर संस्थांसह आय. सी. एस. एस. आर., इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स (बंगळूर) यांचेकडून विद्यापीठास या वर्षभरात एकूण ८३ लाख ६६ हजार ४८३ रुपये निधी प्राप्त झाला.

पुढारी



कोल्हापूर : कर्मवीर भाऊराव पाटील यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, अजित चौगुले, डॉ. एन. जे. बनसोडे आदी उपस्थित होते. (छाया : पप्पू अत्तार)

# विद्यापीठात कर्मवीर भाऊराव पाटील यांना अभिवादन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

थोर शिक्षण प्रसारक कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांना पुण्यतिथीनिमित्त शिवाजी विद्यापीठात अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. तत्पूर्वी, प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी विद्यापीठाच्या प्रांगणातील कर्मवीर पाटील यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासही पुष्प वाहून अभिवादन केले.

यावेळी वित्त व लेखा अधिकारी अजित चौगुले, उपकुलसचिव डॉ. एन. जे. बनसोडे, डॉ. संभाजी शिंदे, डॉ. जगदीश सपकाळे, डॉ. धनश्री शिंदे आदी उपस्थित होते.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठात टेक्नोसिसिस स्पर्धा उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातर्फे टेक्नोसिसिस २०२३ या राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन केले होते. त्यात विविध महाविद्यालयांच्या दोनशेहून अधिक विद्यार्थ्यांनी पोस्टर प्रेसेंटेशन, मॉडेल प्रेझेंटेशन, क्वीझ कॉम्पिटिशन, लॅन गेमिंग या स्पर्धेत सहभाग घेतला.

स्पर्धेच्या उद्घाटनावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, युनिकेम लॅबोरेटरीज प्रायव्हेट लि.चे अभयसिंग देसाई, तंत्रज्ञान विभागाचे संचालक प्रा. डॉ. एस. एन. सपली उपस्थित होते. अभयसिंग देसाई म्हणाले, ध्येय, ज्ञान व अथक परिश्रम ही यशस्वी होण्याची त्रिसूत्री आहे. डॉ. व्ही. एन. शिंदे म्हणाले, शाश्वत विकास व त्या दृष्टीने तंत्रज्ञानाची वाटचाल असली पाहिजे. २०३५ पर्यंत काही मूलद्रव्य नाहीसे होण्याच्या मार्गावर असतील. यासाठी रिव्हर्स इंजिनिअरिंगचा उपयोग कसा करता येईल यासाठी काम करण्याची आवश्यकता आहे. यावेळी प्रा. गिरीष कुलकर्णी, श्रीपाल एम.गायकवाड, प्रा. डॉ. एस. एच. ठकार उपस्थित होते.

11 MAY 2023
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातर्फे टेक्नोसिस स्पर्धा

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातर्फे टेक्नोसिस २०२३ या राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन रसायन अभियांत्रिकी शाखेतर्फे केले होते. या स्पर्धेचे उद्घाटन प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. युनिकेम लॅबोरेटरीज प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे अभयसिंग देसाई हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तंत्रज्ञान विभागाचे संचालक प्रा. डॉ. एस. एन. सपली हे अध्यक्षस्थानी होते.

अभयसिंग देसाई म्हणाले, विद्यार्थ्यांना यशस्वी व्हायचे असेल तर ध्येय, ज्ञान व अथक परिश्रम ही त्रिसूत्री अवलंबली पाहिजे. डॉ. व्ही. एन. शिंदे म्हणाले, शाश्वत विकास व त्यादृष्टीने तंत्रज्ञानाची वाटचाल असली पाहिजे.



याप्रसंगी डॉ. सपली यांनी तंत्रज्ञान विभागात विद्यार्थ्यांनी विविध क्लबच्या माध्यमातून घेतलेल्या उपक्रमांचा मागोवा घेतला. याप्रसंगी प्रा. गिरीश कुलकर्णी उपस्थित होते. स्पर्धेचे समन्वयक श्रीपाल गायकवाड यांनी विविध महाविद्यालयाच्या दोनशेहून अधिक विद्यार्थ्यांनी पोस्टर प्रेझेंटेशन, मॉडेल प्रेझेंटेशन, क्वीझ कॉम्पिटिशन या बरोबरच लॅन गेमिंग या स्पर्धेत सहभाग घेतला होता, अशी माहिती दिली. बक्षीस वितरणासाठी प्रा. डॉ. एस. एच. ठकार यांनी विद्यार्थ्यांना येणाऱ्या काळातील येणाऱ्या बदलानुसार आपले संशोधन करावे, असे आवाहन केले.

यावेळी प्रा. डॉ. पी. डी. पाटील, डॉ. डी. एम. नांगरे, ए. बी. मडावी, डॉ. प्रशांत पाटील, वैशाली मोहिते, शीतल देहनकर, निकिता दिंडे उपस्थित होते. सूत्रसंचालन अरिबा, पायल पाटील, सीमा माने आणि ईशा या विद्यार्थ्यांनी केले.

पुढारी

# तंत्रज्ञान अधिविभागातर्फे 'टेक्नोसिस २०२३' राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन



कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातर्फे टेक्नोसिस २०२३ या राज्यस्तरीय स्पर्धेचे रसायन अभियांत्रिकी शाखेतर्फे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेचे उद्घाटन प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आणि युनिकेम लॅबोरेटरीज प्रायव्हेट लि.चे अभयसिंग देसाई यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

डॉ. व्ही. एन. शिंदे म्हणाले, शाश्वत विकास व त्या दृष्टीने तंत्रज्ञानाची वाटचाल असली पाहिजे. २०३५ पर्यंत काही मूलद्रव्य नाहीसे होण्याच्या मार्गावर असतील. यासाठी रिव्हर्स इंजिनिअरिंगचा उपयोग कसा करता येईल, यासाठी काम करण्याची आवश्यकता आहे.

श्रीपाल एम. गायकवाड यांनी विविध महाविद्यालयांच्या दोनशेहून अधिक विद्यार्थ्यांनी पोस्टर प्रेझेंटेशन, मॉडेल प्रेझेंटेशन, क्वीझ कॉम्पिटिशन याबरोबरच लॅन गेमिंग या स्पर्धेत सहभाग घेतला होता, अशी माहिती दिली.

यावेळी तंत्रज्ञान आणि अभियांत्रिकी शाखेच्या प्रभारी अधिष्ठाता प्रा. डॉ. श्रीमती एस. एच. ठकार, डी. एम. नांगरे, ए. बी. मडावी, डॉ. प्रशांत पाटील, वैशाली मोहिते, शीतल देहनकर, निकिता दिंडे उपस्थित होत्या.

सूत्रसंचालन पायल पाटील, सीमा माने यांनी केले. आभार चंद्रहास शिंदे, अनुज चोपडे व धैर्यशील घोटणे यांनी मानले.

लोकमत

# विद्यापीठात रंग कला-संस्कृतीचे दर्शन

## राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती कृतज्ञता पर्व सांगता कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** 'लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती सांगता आणि कृतज्ञता पर्वानिमित्त शिवाजी विद्यापीठामध्ये बुधवारी 'रंग कला-संस्कृतीचे' दर्शन घडले. संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी बहारदार सादरीकरण केले.




शिवाजी विद्यापीठात बुधवारी लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती सांगता व कृतज्ञता पर्वानिमित्त गीतांचे बहारदार सादरीकरण केले.

संगीत व नाट्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. अंजली निगवेकर यांच्या हस्ते कार्यक्रमाची सुरुवात झाली. विद्यार्थी रुद्र कुलकर्णी यांनी राग गुर्जरी तोडी, धनाजी पाटील यांनी एकल तबला वादन सादर केले. प्रीतीसुरी दुधारी, निर्गुणाचा संग, हे श्याम सुंदरा, बोलावा विठ्ठल, अंदाज आरशाचा, मधुकर वनवन फिरत करी या गाण्यांचे धनश्री गाडगीळ, प्रियांका मिरजकर व प्रतीक्षा पवार यांनी रंजक व ढंगदार सादरीकरण केले.

डॉ. विनोद ठाकूर -देसाई यांनी प्रास्ताविक केले. अतुल परीट यांनी सूत्रसंचालन केले. हार्मोनियमची साथ गौरी कुलकर्णी, डॉ. सचिन कचोटे, तबल्याची साथ सौरभ सनदी यांनी केली. मराठी अधिविभागाचे प्रमुख प्रा. डॉ. नंदकुमार मोरे, प्रा. डॉ. रणधीर शिंदे व इंग्रजी विभागाचे प्रा. डॉ. प्रभंजन माने उपस्थित होते.

पुण्यनगरी



# शिवाजी विद्यापीठात बहरली रंग कला संस्कृती मैफल

**कोल्हापूर :** 'लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती सांगता व कृतज्ञता पर्व २०२३ निमित्त शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या वतीने 'रंग कला संस्कृतीचे' या कार्यक्रमाचे अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी बहारदार सादरीकरण केले.




भरतनाट्यम् विभागाच्या विद्यार्थिनींच्या गणेश वंदनेने मैफलीला सुरुवात झाली. त्यानंतर अधिविभागाचे विद्यार्थी रुद्र कुलकर्णी यांनी राग गुर्जरी तोडी, धनाजी पाटील यांनी एकल तबला वादन सादर केले. प्रीतिसुरी दुधारी, निर्गुणाचा संग, हे श्याम सुंदरा, बोलावा विठ्ठल, अंदाज आरशाचा, मधुकर वणवण फिरत करी या गाण्यांचे धनश्री गाडगीळ, प्रियांका मिरजकर व प्रतीक्षा पवार या विद्यार्थिनींनी अतिशय रंजक व ढंगदार सादरीकरण केले.

हार्मोनियमची साथ गौरी कुलकर्णी, डॉ. सचिन कचोटे, तबल्याची साथ सौरभ सनदी यांनी केली. प्रास्ताविक डॉ. विनोद ठाकूर-देसाई यांनी केले. तर सूत्रसंचालन अतुल परीट यांनी केले.

यावेळी मराठी अधिविभागाचे विभागप्रमुख प्रा. डॉ. नंदकुमार मोरे, प्रा. डॉ. रणधीर शिंदे व इंग्रजी विभागाचे प्रा. डॉ. प्रभंजन माने त्याबरोबर संगीत व नाट्यशास्त्र विभागाचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक उपस्थित होते.

पुढारी

# शाहू महाराज स्मृती कृतज्ञता पर्वमध्ये 'रंग कला संस्कृती'चे सादरीकरण

**कोल्हापूर :** लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती सांगता व कृतज्ञता पर्व कार्यक्रमात शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या वतीने रंग कला संस्कृतीचे या कार्यक्रमाचे अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी बहारदार सादरीकरण केले. यावेळी रूद्र कुलकर्णी यांनी राग गुर्जरी तोडी, धनाजी पाटील यांनी एकल तबला वादन सादर केले. प्रितीसुरी दुधारी, निर्गुणाचा संग, हे श्याम सुंदरा, बोलावा विठ्ठल, अंदाज आरशाचा, मधुकर वनवन फिरत करी गाणी सादर केली. यावेळी संगीत व नाट्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. अंजली निगवेकर उपस्थित होत्या. प्रास्ताविक व आभार डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी मानले. सूत्रसंचलन अतुल परीट यांनी केले. हार्मोनियमवर सौ. गौरी कुलकर्णी, डॉ. सचिन कचोटे, तबला सौरभ सनदी साथ संगत केली. कर्मचारी, विद्यार्थी, पालक मोठया संख्येने उपस्थित होते.

पुढारी

# डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनात दोन कोर्सला मान्यता

## डॉक्युमेंटरी फोटोग्राफी, शॉर्ट फिल्म मेकिंगला प्रवेश सुरू

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनामध्ये सर्टिफिकेट कोर्स इन डॉक्युमेंटरी फोटोग्राफी आणि सर्टिफिकेट कोर्स इन शॉर्ट फिल्म मेकिंग हे दोन अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने मान्यता दिली. चालू शैक्षणिक वर्षापासून हे दोन्ही अभ्यासक्रम सुरू होत असून या अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे.

डॉ. ग. गो. जाधव अध्यासनात पी. जी. डिप्लोमा इन ऑनलाईन जर्नालिझम हा अभ्यासक्रम आधीपासूनच सुरू आहे. डिप्लोमाला प्रवेश घेण्यासाठी कोणत्याही शाखेतील पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. सर्टिफिकेट कोर्ससाठी बारावी पास ही पात्रता निश्चित केली आहे. डॉक्युमेंटरी फोटोग्राफी आणि शॉर्ट फिल्म मेकिंग या दोन्ही सर्टिफिकेट कोर्ससाठी वयाची कोणतीही अट नाही. या दोन्हीही अभ्यासक्रमांसाठी ८ हजार २०० रुपये शुल्क असून दर शनिवार आणि रविवारी या अभ्यासक्रमांचे वर्ग होतील. दोन्ही अभ्यासक्रमांसाठी प्रत्येकी केवळ २० जागा आहेत.

हे अभ्यासक्रम शिकवण्यासाठी विद्यापीठामध्ये स्टुडिओ, कॉम्प्युटर लॅब, डिजिटल क्लासरूम, कॅमेरे, एडिटिंग सॉफ्टवेअर उपलब्ध करून देण्यात आले आहे. अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण देण्यासाठी शॉर्ट फिल्म आणि डॉक्युमेंटरी तसेच फोटोग्राफी या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींचे लेक्चर होणार आहेत.

अध्यासनात सुरू असलेल्या डिप्लोमा आणि सर्टिफिकेट कोर्ससाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून विद्यार्थ्यांनी तसेच या अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्यांनी नॅनो टेक्नॉलॉजीशेजारी असलेल्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनात संपर्क साधावा, असे आवाहन अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठात डॉक्युमेंटरी, शॉर्ट फिल्म मेकिंग कोर्स

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनात डॉक्युमेंटरी फोटोग्राफी आणि शॉर्ट फिल्म मेकिंग हे दोन सर्टिफिकेट अभ्यासक्रम सुरू करण्यास विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने मान्यता दिली. चालू शैक्षणिक वर्षापासून हे दोन्ही अभ्यासक्रम सुरू होत असून अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. अध्यासनात पी. जी. डिप्लोमा इन ऑनलाइन जर्नालिझम हा अभ्यासक्रम आधीपासूनच सुरू आहे. डिप्लोमाला प्रवेश घेण्यासाठी कोणत्याही शाखेतील पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. डॉक्युमेंटरी फोटोग्राफी आणि शॉर्ट फिल्म मेकिंग या दोन्ही सर्टिफिकेट कोर्ससाठी वयाची कोणतीही अट नाही. दर शनिवारी, रविवारी या अभ्यासक्रमाचे वर्ग होतील.

दोन्ही अभ्यासक्रमांसाठी प्रत्येकी २० जागा आहेत. हे अभ्यासक्रम शिकवण्यासाठी विद्यापीठामध्ये स्टुडिओ, कॉम्प्युटर लॅब, डिजिटल क्लासरूम, कॅमेरे, एडिटिंग सॉफ्टवेअर उपलब्ध करून देण्यात आल्याचे अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी सांगितले.

लोकमत

# ४६५ विद्यार्थ्यांनी दिली प्रवेश परीक्षा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या २०२३-२०२४ या शैक्षणिक वर्षामध्ये विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठातील विविध अधिविभागात पदव्युत्तर अभ्यासक्रमांना नियमित प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची प्रवेश परीक्षा सध्या सुरु आहे.

बुधवारी (दि.१०) एमएस्सी पर्यावरणशास्त्र, एम.ए. (रशियन भाषा), एमएस्सी (फूड सायन्स), एमएस्सी (बायोटेक्नॉलॉजी) या चार अभ्यासक्रमांसाठी प्रवेश परीक्षा घेण्यात आली. ४६५ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली.

तरुण भारत

# विद्यापीठात डॉक्युमेंटरी फोटोग्राफी, शॉर्ट फिल्म मेकिंग कोर्सला मान्यता

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सर्टिफिकेट कोर्स इन डॉक्युमेंटरी फोटोग्राफी आणि सर्टिफिकेट कोर्स इन शॉर्ट फिल्म मेकिंग हे दोन अभ्यासक्रम सुरू करण्यास विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने मान्यता दिली. चालू शैक्षणिक वर्षापासून हे दोन्ही अभ्यासक्रम सुरू होत आहेत.

पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनातअभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. अध्यासनात पी. जी. डिप्लोमा इन ऑनलाइन जर्नलिझम हा अभ्यासक्रम आधीपासूनच सुरू आहे. डिप्लोमाला प्रवेश घेण्यासाठी कोणत्याही शाखेतील पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे; मात्र सर्टिफिकेट कोर्ससाठी बारावी पास ही पात्रता निश्चित करण्यात आली आहे.

डॉक्युमेंटरी फोटोग्राफी आणि शॉर्ट फिल्म मेकिंग या दोन्ही सर्टिफिकेट कोर्ससाठी वयाची कोणतीही अट नाही. या दोन्हीही अभ्यासक्रमासाठी ८,२०० रुपये शुल्क असून दर शनिवार आणि रविवारी या अभ्यासक्रमाचे वर्ग होतील. दोन्ही अभ्यासक्रमासाठी प्रत्येकी केवळ २० जागा आहेत. हे अभ्यासक्रम शिकवण्यासाठी विद्यापीठामध्ये स्टुडिओ, कॉम्प्युटर लॅब, डिजिटल क्लासरूम, कॅमेरे, एडिटिंग सॉफ्टवेअर उपलब्ध करून देण्यात आले आहे.